इंचार्ज कॉपी

FORM-1A

NCRB
IIF-I

## पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT 0154184

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 25, वर्ष Year 2022, दिनांक Date 26/04/2022

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम 1988, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from 21/04/22, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to 25/04/22, वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 12/04/2022, वेळ Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 04, तारीख Date 26/04/2022, वेळ Time 4.45 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name दिपक हॉटेल, ठिकाणाचे नंबर No. if any कल्याण (प.), गल्ली Ward रेल्वे स्टेशन, रस्त्याचे नाव Name of road जवळ
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place कल्याण, गाव Village पश्चिम, पोस्ट Post ठाणे, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name विजय सोनार (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name माधवराव सोनार
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 1/07/1963 59 वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 9870317488
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste इ. माव., जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : C-4 605, गल्ली / सर्वे नं. Ward नवी लोकधारा, घर / नाव नं. House/Name No. को. ऑ., फोन / मो. नं. Phone/Mo. No. हौ., पॅन नं. PAN No. सोसायटी, गटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road लोकधारा कॉम्प्लेक्स, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place फेज 2, गाव Village कल्याण पुर्व, पोस्ट Post ठाणे, 421306, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   पद्माकर बाबुराव पोटे. वय-57 वर्षे, नोकरी (वरिष्ठ लिपिक) पुर्वप्रादेशिक विभाग, चेंबुर मुंबई. रा.ठि. यशवंत पार्क रुम नं 102, एस विंग वालकरीरोड, बदलापुर पश्चिम ठाणे.



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी विजय माधवराव सोनार यांचा स्वतंत्र पानावर संगणकीकृत केलेला जबाब हाच गुन्ह्याच्या प्रथम खबरी अहवाल समजण्यात यावा.

समक्ष

(शैलेंद्र चव्हाण)
पोलीस निरीक्षक,
गु.प्र.वि. मुंबई.

V.M. Sonar

फिर्याद

दिनांक – २६/०४/२०२२.

मी विजय माधवराव सोनार, वय ५९ वर्षे, धंदा–सेवानिवृत्त (स.पो.उप निरीक्षक), रा. ठी.सी–४/६०५, नंदी लोकधारा को.ऑ.हौ.सो., लोकधारा कॉम्प्लेक्स फेज–२, कल्याण (पुर्व), जिल्हा–ठाणे, मो.क्र. ९८७०३१७४८८.

———————

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर सध्या माझी पत्नी व मुलगा यांचेसह रहात आहे. मी बृहन्मुंबई पोलीस दलातुन नियत वयोमानानुसार दि. ३० जुन २०२१ रोजी मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई येथून सेवानिवृत्त झालो आहे.

दिनांक २२/०३/२०२२ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेचे सुमारास माझे वरील नमुद मोबाईल फोनवर एका व्यक्तीने फोन करुन "मी हेडक्लार्क पोटे, पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर, मुंबई येथून बोलत असल्याचे सांगुन मला तुमच्या रजा रोखीकरण रक्कमेच्या बिला संदर्भात भेटावयाचे आहे असे सांगितले." त्यानंतर दि. २३/०३/२०२२ रोजी मोबाईल क्र. ७७३८०६३९८९ या फोनवरुन श्री. पोटे यांनी मला फोन करुन रात्री ०८.०० वाजता कल्याण स्टेशन येथे भेटावयास बोलाविले, त्यावेळी पोटे यांनी मला, " तुमचे रजा रोखीकरणाचे ३०० दिवस पूर्ण नसुन तुमचे जवळपास रु. २,००,०००/– चे नुकसान होईल. जर तुम्ही मला रु. ६०,०००/– दिले तर मी सर्व नियमात बसवुन तुमचे काम करुन देतो असे सांगितले." त्यावेळी मी त्यांना विनवणी केली असता त्यांनी रु. २५,०००/– दया तुमचे काम करतो असे सांगितले.

मी बृहन्मुंबई पोलीस दलातुन सेवानिवृत्त झालो असल्याने व माझी सध्या आर्थिक परीस्थीती ठिक नसल्याने श्री. पोटे यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम नसल्याने मी त्याबाबत विचार करुन कळवितो असे सांगितले होते. परंतु मला श्री. पोटे यांना लाचेची रक्कम दयावयाची इच्छा नसल्याने मी दि. १२/०४/२०२२ रोजी लोकसेवक श्री. पोटे यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार अर्ज दिला. दरम्यान मी माझे वैयक्तीक कामाकरीता माझे मुळगावी गेलो होतो. त्यामुळे मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात येता आले नाही.

दि. २१/०४/२०२२ रोजी श्री. पोटे यांनी मला माझे मोबाईल फोनवर संपर्क साधुन कल्याण रेल्वेस्टेशन येथे रात्री ०८.०० वा. भेटण्यासाठी बोलाविले असल्याचे मी पो.नि. शैलेंद्र चव्हाण यांना कळविले त्यांचे सुचनेनुसार मी सायंकाळी ०६.०० वा. हॅाटेल गुरुकृपा कल्याण पश्चिम येथे हजर झालो. थोडयाच वेळात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे एक पथक सरकारी वाहनातुन त्याठिकाणी हजर झाले. पथकातील स.पो.आ. श्री. आबासाहेब पाटील, पो.ना. श्री. चंदनशिवे, पो.ना. श्री. यादव व दोन सरकारी पंच श्री. निलेश भांडे व श्री. सचिन हेंबाडे यांची पो.नि. चव्हाण यांनी माझ्याशी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी मला व दोन पंचाना पडताळणी कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर एका शासकीय वाहनात बसुन पो.नि. चव्हाण, माझे तसेच दोन सरकारी पंच यांचे वक्तव्य एका डीजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रित केले. त्यांनतर पो.नि. चव्हाण यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाच्या आतील बाजुस बनियनला अडकविला. त्यानंतर मी व पंच श्री. निलेश भांडे पायी चालत कल्याण रेल्वे स्थानक पश्चिम येथे गेलो. काही वेळाने मी श्री. पोटे यांना माझे मोबाईल फोनवरुन संपर्क साधुन कल्याण स्थानका समोरील दिपक हॉटेल येथे येण्यास सांगितले. त्यावेळी माझे सोबत असलेले पंच श्री. भांडे हे दिपक हॉटेलमध्ये जावुन बसले. थोडयावेळात लोकसेवक पोटे हे दिपक हॉटेलच्या बाहेर मला भेटले त्यानंतर मी पोटे यांना घेवून दिपक हॉटेल मध्ये गेलो व तेथे बसलेले पंच श्री. भांडे यांचे शेजारील टेबलाजवळ जावुन बसलो त्यावेळी मी लोकसेवक पोटे यांना रजा रोखीकरणाचे कामाबाबत विचारणा केली व माझे घरगुती अडचणीमुळे आधी ठेरलेली रक्कम रु. २५,०००/– देणे शक्य नसल्याचे सांगुन कमी करण्याबाबत विनवणी केली त्यावेळेस श्री. पोटे

Scanned with OKEN Scanner

यांनी रु. ५,०००/— कमी करुन रु. २०,०००/— एक रकमी देण्याबाबत सांगितले. त्यानंतर श्री. पोटे तेथुन निघुन गेले तसेच मी व पंच श्री. भांडे असे पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी हॉटेल गुरुकृपा येथे आलो. सदर ठिकाणी आल्यानंतर माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर पो.नि. चव्हाण यांनी काढुन घेवुन तो बंद केला. त्यावेळी मी व पंच यांनी माझे व लोकसेवक पोटे यांचेमध्ये झालेले संभाषणाची हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन पंचांना ऐकवला असता त्यामध्ये माझे व लोकसेवक पोटे यांचेमध्ये झालेल्या संभाषणात लोकसेवक पोटे यांनी रजा रोखीकरणाचे काम करुन देण्यासाठी माझ्याकडे रु. २०,०००/— लाचेची रक्कमेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सदर पडताळणी कारवाई स्थगीत करण्यात आली.

दि. २५/०४/२०२२ रोजी मी, लोकसेवक श्री. पोटे यांचेशी मोबाईल फोनद्वारे संपर्क केला असता त्यांनी रात्री ०८:०० वाजता कल्याण प. रेल्वेस्टेशन समोर भेटण्यास बोलाविले. त्याबाबत मी मोबाईल फोनद्वारे पो.नि. चव्हाण यांना माहिती दिली असता त्यांनी मला संध्याकाळी ०५.३० वा. हॉटेल गुरुकृपा, कल्याण पश्चिम येथे येण्याबाबत सांगितले. त्यानुसार मी सदर ठिकाणी हजर झालो असता त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील पो. अधिकारी, अंमलदार व दोन सरकारी पंच तेथे दोन सरकारी वाहनातुन हजर झाले. त्यानंतर पो. नि. चव्हाण यांनी त्यांचे सोबत आलेल्या पथकातील सर्व अंमलदार यांची ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी मला, पोलीस पथक व दोन पंचाना सापळापुर्व व सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर एका शासकीय वाहनात बसुन पो.नि. चव्हाण, माझे तसेच दोन सरकारी पंच यांचे वक्तव्य एका डीजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी माझ्या बचतीतून आणलेली लाचेची रक्कम रु. १०,०००/— ( भारतीय चलनाच्या रु. ५००/— दराच्या एकुण २० नोटा) पो.नि. चव्हाण यांचेकडे सुपुर्द केली. त्यावेळी पो.नि. चव्हाण यांनी मला व दोन पंचांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व त्यांचे सुचनेनुसार पथकातील वाहन चालक श्री. चिचोळकर यांनी नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावली. व ती रक्कम माझे शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये अलगद ठेवली व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाच्या आतील बाजुस बनियनला अडकविला. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांचे सुचनेनुसार मी व पंच श्री. निलेश भांडे पायी चालत कल्याण रेल्वे स्थानक पश्चिम येथे गेलो. आमचे पाठोपाठ पथकातील अधिकारी व अंमलदार असे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने आमचे पासुन काही अंतर ठेवुन दिपक हॉटेल येथे आजुबाजुला येवून थांबले. काही वेळाने मी श्री. पोटे यांना माझे मोबाईल फोनवरुन संपर्क साधुन कल्याण स्थानका समोरील दिपक हॉटेल येथे येण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी दिलेल्या सुचनेनुसार पंच श्री. निलेश भांडे, पो. ह. पानगले, पो.शि. परब व म.पो.शि. नलावडे असे अगोदर दिपक हॉटेलमध्ये जावुन बसले. तसेच स.पो.आ. आबासाहेब पाटील व पो.नि. चव्हाण व सापळा पथकातील इतर अंमलदार हे दिपक हॉटेलचे आजुबाजुला कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहीले. थोडयावेळाने लोकसेवक पोटे मला हॉटेलच्या बाहेर भेटले त्यांना घेवून मी हॉटेल मध्ये गेलो व

समक्ष,

( शैलेंद्र चव्हाण ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

V.M. Sonar

( विजय माधवराव सोनार )

Scanned with OKEN Scanner

पंच श्री. भांडे व पो.ह. पानगले तसेच पो.शि. परब व म.पो.शि. नलावडे हे बसलेल्या टेबला शेजारच्या टेबलावर जावुन बसलो.

त्यानंतर मी लोकसेवक श्री. पोटे यांना ठरल्याप्रमाणे लाचेची रु. १०,०००/– ची रक्कम आणली असल्याचे सांगितले असता त्यांनी पुर्ण रु. २०,०००/– लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना उर्वरीत रक्कम एटीएम मधुन विड्रॉ करुन देतो असे सांगुन मी आता आणलेली लाचेची रक्कम रु. १०,०००/– त्यांचेसमोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने घेवून पॅन्टीचे उजव्याबाजुचे समोरील चोरकप्प्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझ्या शेजारच्या टेबलावर बसलेल्या सापळा पथकातील अंमलदारांना माझा डावा हात वारंवार डोक्यावरुन फिरवुन पुर्वनियोजित इशारा केला असता सापळा पथकातील अंमलदारांनी तात्काळ लोकसेवक श्री. पोटे यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले.

लोकसेवक श्री. पद्माकर पोटे, हेडक्लार्क, अपर पोलीस आयुक्त यांचे कार्यालय पुर्व प्रादेशिक विभाग, चेंबुर मुंबई यांनी माझेशी संपर्क करुन माझे रजा रोखीकरणाचे ३०० दिवस पुर्ण नसुन रु. २,००,०००/– चे नुकसान हाईल असे सांगुन ते नियमात बसवुन काम करुन देण्यासाठी माझ्याकडे रु. ६०,०००/– लाचेची मागणी केली त्यानंतर मी विनवणी केली असता रु. २५,०००/– दयावे लागतील असे सांगितले. त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान तडजोडी अंती रु. २०,०००/– स्विकारण्याचे कबुल करुन दि. २५/०४/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान पहीला हप्ता रु. १०,०००/– लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक श्री. पद्माकर पोटे याचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक श्री. पद्माकर पोटे, हेडक्लार्क, यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचुन पाहीली असता माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

V.M. Sonaar

( शैलेंद्र चव्हाण ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

( विजय माधवराव सोनार )

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील तक्रारदार हे सेवानिवृत्त पो. अंमलदार आहेत. त्यांचे सेवानिवृत्ती नंतर मिळणाऱ्या देयकांपैकी रजा रोखीकरणाचे बील आलोसे यांचेकडे प्रलंबित होते. सदर फिर्यादी यांचे रजा रोखीकरणाचे काम करून देण्यासाठी आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडे रु.25000/- ची मागणी केली व तडजोडी अंती रु.20,000/- स्विकारण्याचे मान्य केले. व आज रोजी सापळा कारवाईदरम्यान रु. 10,000/- स्विकारत असताना आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

शैलेंद्र चव्हाण – पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. .......... District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

V.M. [signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name शैलेंद्र चव्हाण

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ..........

Posting का.प्र.वि मुंबई.

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner